कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/हिंसंवि/२०२४-२५/८७१
दि. १८/०७/२४

# कृपया प्रसिध्दीसाठी

दरवर्षीप्रमाणे कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे "गुरुपौर्णिमा" उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२२ जुलै २०२४ रोजी "गुरुपौर्णिमा" व दि.२३ जुलै २०२४ रोजी "संगीत मेळावा" असा दोन दिवसांचा संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. सोमवार दि.२२ जुलै २०२४ रोजी कला अकादमीच्या मा. दिनानाथ मंगेशकर सभागृहात दुपारी ठिक ३.०० वाजता मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे. व तदनंतर गुरुपुजनाचा मुख्य कार्यक्रम संपन्न होणार आहे.

सर्वप्रथम "पारब्रम्ह परमेश्वर" हा शास्त्रीय सहगायनाचा कार्यक्रम होईल. त्यामध्ये कु. मुक्ता मिसर, कु. सत्यनारायण कळंगुटकर, कु. सदानंद झो, कु. राज्ञी फळदेसाई, कु. शौनक ओटावणेकर, श्री. शिशिर शंखवाळकर, कु. शुभम नाईक, कु. वसंत च्यारी सौ. महालक्ष्मी कुलकर्णी, कु. शिवसागर नाईक, कु. विश्वजीत फडते गावकर, कु. रॉन ॲलेक्स, कु. कार्तिक आमोणकर, कु. सुरेश पाळणी, कु. शांभवी नाईक, कु. स्वरा नाईक, कु. आश्मी प्रभुदेसाई, कु. आश्मा भगत, कु. वंशिका प्रियोळकर व कु. रेणुका नाईक हे विद्यार्थी आपली गायन कला सादर करणार आहेत.

शास्त्रीय गायनानंतर कु. ऋग्वेद जावडेकर व कु. उत्कर्षा फोंडेकर यांचे संवादिनी सहवादन होणार आहे. व त्यानंतर तबला सहवादनाचा कार्यक्रम होईल त्यामध्ये कु. कौस्तुभ च्यारी, कु. योगिराज पै, कु. कामेश रेडकर व कु दिपतेज रेवोडकर हे विद्यार्थी सहभागी होतील. तबला वादनानंतर कु. अर्थव गायक याचे बासरीवादन होईल व तद्‌नंतर गुरुवर्य श्री. सुभाष फातर्पेकर यांचा संवादिनी एकल वादनाचा कार्यक्रम होणार आहे.

गायन-वादनाच्या कार्यक्रमानंतर कथ्थक नृत्याचा कार्यक्रम होईल त्यामध्ये प्रथम कु. वरदा चव्हाण, कु. प्रेरणा प्रभु व कु. दिया नागवेकर यांचे सादरीकरण होईल व नंतर कु. उमा नाईक, कु सान्वी धुपकर, कु. कन्या नाईक, कु. कृतिका महाले कु. आरुणी प्रभु, कु. रिधिमा वेंगुर्लेकर व कु. स्पुर्ती शानबाग याचे कथ्थक नृत्याचे सादरीकरण होईल.

कथ्थक नृत्यानंतर भरतनाटयम् नृत्याचा कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये सर्वप्रथम कु. निधी नाईक शिरोडकर, कु. श्रध्दा कुलकर्णी, कु. मंजिरी फुटणकर, कु. नेहाली किनळकर, कु. सान्वी केंकरे, कु. श्राव्या शेट, कु. इच्छा नाईक, कु. आरोही सुभेदार कु. वर्लिका पिसुर्लेकर, कु. गिना पाडगावकर, कु. शताक्षी फळगांवकर, कु. इशिता शेटकर, कु. आभा नाडकर्णी, कु. ॲना मारीया या विद्यार्थीनी सहभागी होणार आहेत. व नंतर कु. गौरी शानबाग, कु. अमिषा अडकोणकर कु. गौरवी फडके, कु. जानवी प्रभु म्हाबरे, कु. प्रतिका मराठे, कु. अनुश्री कोळी, कु. तृप्ती दळवी, कु. मुस्कान खानोलकर, कु. मिश्का बेग व कु. कला नाग चैत्राली यांच्या भरतनाटयम नृत्याने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

गायन वादन व नृत्याच्या कार्यक्रमासाठी श्री. पांडुरंग गावस, श्री. गितेश मांद्रेकर, श्री. सुरज मोरजकर व श्री. भार्गवराम गर्दे यांची तबलासाथ, श्री. चारुदत्त गांवस व श्री. शुभम नाईक यांची संवादिनी साथ व श्री. रोहीत वनकर यांची बासरीची साथसंगत लाभणार आहे. कथ्थक नृत्यासाठी सौ. वरदा बेडेकर यांची पढंत साथ लाभेल तसेच सौ सम्राज्ञी आईर यांची गायन साथ लाभणार आहे. व भरतनाटयम् नृत्यासाठी डॉ. सपना नाईक व सौ. मंदिरा तिरोडकर यांची नटवंगमची साथ तसेच डॉ. दिप्ता रुबसुंदरम, यांची गायन साथ व श्री चेथनमुर्ती डी. आर यांची मृदंगम् ची साथसंगत लाभणार आहे.

दुस-या दिवशी दि.२३ जुलै २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता कला अकादमीच्या, पेडणे, साखळी, वाळपई, सांगे, केपे व काणकोण या संगीत केंद्रतील विद्यार्थ्यांचा "संगीत मेळावा" हा शास्त्रीय गायन-वादनाचा कार्यक्रम होणार आहे. हा कार्यक्रम कला अकादमीच्या कृष्ण कक्षात संपन्न होणार आहे. सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. सकाळच्या सत्राची सुरुवात पेडणे संगीत केंद्रातील विद्यार्थी कु. हर्ष नागवेकर व कु. रोहन सोपटे यांच्या तबला सहवादनाने कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. तबला वादनानंतर कु. रुद्रेश नाईक व कु. अनंत तळवणेकर यांचे सवादिनी सहवादन होईल व नंतर कु. सिध्दांत गोंधळी व मैथिली च्यारी यांच शास्त्रीय गायन होणार आहे.

त्यानंतर केपे संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा गायन-वादनाचा कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये सर्वप्रथम कु. सारा दलाल हिचे शास्त्रीय गायन होईल त्यानंतर कु. निशाल गांवकर यांचे संवादिनी वादन होईल. व तबला सहवादनामध्ये कु. स्वप्नील नाईक शिरोडकर, कु. आर्यन नाईकं कु. स्वयम आडेल, कु. प्रशाल गांवकर हे आपली कला सादर करणार आहेत. तबला वादनानंतर काणकोण संगीत केंद्रातील विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. त्यामध्ये प्रथम कु. सायली पागी व कु. ऋत्वी पागी यांचे सहगायन होणार आहे. व नंतर ऋतीक वेळीप यांचे संवादिनी वादन व कु. विभव भगत यांच्या तबला वादनाने सकाळच्या सत्राची सांगता होणार आहे. दुपारच्या सत्राची सुरुवात वाळपई केंद्रातील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने होणार आहे. त्यामध्ये कु. रोहन गांवकर, कु. संदेश केळकर व कु. फुलवंती गांवस यांचे शास्त्रीय गायन होणार आहे. व नंतर कु. नमन च्यारी व कु. रुपेश पोळेकर हे विद्यार्थी तबला वादन सादर करतील, त्यानंतर कु. शर्वाणी खोलकर हिचे संवादिनी वादन होईल. त्यांनंतर सांगे संगीत केंद्रातील विद्यार्थी आपली कला सादर करणार आहेत. त्यामध्ये कु. सौम्या कोसंबे हिचे शास्त्रीय गायन होईल. कु. विहान देव यांचे संवादिनी वादन व कु. तेजस तोरस्कर यांचे तबला वादन होईल. शेवटच्या सत्रात साखळी संगीत केंद्रातील विद्यार्थ्यांचा गायन-वादनाचा कार्यक्रम होईल. त्यामध्ये कु. कश्मा वांतेकर व कु. गौराई नाईक यांचे शास्त्रीय गायन होईल. नंतर कु. अद्वीता नाईक व कु. शौर्या माईणकर यांचे संवादिनी वादन होईल व कार्यक्रमाची सांगता कु. वित्तेश परब, कु. सक्षम सालेलकर व कु. श्रीसाई उसपकर यांच्या तबला वादनाने होणार आहे. संगीत केंद्रातील सर्व कलाकारांना कु. प्रशांत गावकर, कु. तन्मय परब, कु. विभव भगत, कु. अमेय अंगडी, कु. साई शेटये व कु. शौर्या राणे यांची तबला साथ लाभणार आहे.

दोन दिवसांचा हा संगीत कार्यक्रम सर्वांसठी खुला असून सर्व संगीत प्रेमी रसिक श्रोत्यांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाचा आस्वाद घ्यावा असे कला अकादमीच्या भारतीय संगीत व नृत्य विभागातर्फे कळविण्यात आले आहे.

हिंदुस्थानी संगीत व नृत्य विभाग
कला अकादमी गोवा

प्रति

१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड

७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)